www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com +91 97023 86118

दैनिक लोकरक्षणाय

प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक

लोकशाहीच्या संरक्षणार्थ



■ पर्यावरणपूरक उत्सव साजरे करण्यासाठी...
पान ३ वर....



■ विकासात राज्याचा पहिला जिल्हा होऊ पाहणाऱ्या...
पान ६ वर....

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ

■ वर्ष - ०२ ■ अंक २२१ ■ पृष्ठे- ०६ ■ ठाणे, शुक्रवार, १७ जानेवारी २०२५ ■ रु. २/-

■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118

# 'स्टार्टअप्स'साठीचे नवीन धोरण देशातील सर्वाधिक आधुनिक ठरेल - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस






## सिडबी (SIDBI) कडून स्टार्टअप्ससाठी दोनशे कोटी रुपयांची तरतूद

### महाराष्ट्र स्टार्टअप्सची राजधानी : मंत्री मंगलप्रभात लोढा



कौशल्य विकास मंत्री श्री. लोढा म्हणाले की, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून देशात कौशल्य विकास विभाग सुरू करण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यात कौशल्य विकास विभागाला गती दिली. राज्यातील स्टार्टअप्सला जगात पुढे नेण्यासाठी मुख्यमंत्री श्री. फडणवीस प्रयत्नशील आहेत. जगात देशाला नंबर एक बनविण्यासाठी सर्वांचे प्रयत्न आवश्यक आहेत. सर्व स्टार्टअप्स देशाला पुढे नेण्यासाठी नक्कीच प्रयत्न करतील, अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

### राज्यात सर्वाधिक महिला स्टार्टअप्स : फाल्गुनी नायर



'नायका'च्या संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी फाल्गुनी नायर म्हणाल्या की, महिलांनी उद्योगात आघाडीवर येण्यासाठी शासकीय नियमांचे कोणतेही अडथळे नाहीत. उद्योगाच्या अनेक संधी शासनामार्फत उपलब्ध आहेत. मुंबईसह महाराष्ट्रात महिला सुरक्षित असल्याने महिलांचे सक्षमीकरण होत आहे.महाराष्ट्र हे स्टार्टअप्स कॅपिटल असून त्याचा राज्यातील महिलांनी नक्की लाभ घ्यावा, असेही सांगितले.

● मुंबई, विशाल कारंडे :

काळाची गरज ओळखून स्टार्टअप्स धोरणाचा नवीन मसुदा तयार केला आहे. उद्योजकांना सूचनांसाठी हा मसुदा उपलब्ध करून देण्यात आला असून हे देशातील आधुनिक धोरण ठरणार आहे. या माध्यमातून राज्यात नाविन्यता शहराची स्थापना करण्यात येणार आहे. तसेच सिडबी (स्मॉल इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट बँक ऑफ इंडिया) कडून स्टार्टअप्ससाठी दोनशे कोटी रुपयांची तर प्रत्येक प्रादेशिक विभागासाठी तीस कोटी रुपयांची तरतूद करणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. बांद्रा-कुर्ला संकुल येथील जिओ वर्ल्ड ट्रेड सेंटरमध्ये कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागांतर्गत राज्य नाविन्यता सोसायटीच्यावतीने एम्पॉवरींग इनोव्हेशन, एलिव्हेटिंग महाराष्ट्र (Empowering Innovation,Elevating Maharashtra) या संकल्पनेवर आधारित 'राष्ट्रीय स्टार्टअप्स दिवस' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या हस्ते कृत्रिम बुद्धीमत्ता (AI) तंत्रज्ञानाच्या माध्यमातून दीप प्रज्वलन झाले. कार्यक्रमात कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, कौशल्य विकास विभागाचे सचिव गणेश पाटील, आयुक्त प्रदीपकुमार डांगे, व्यवसाय शिक्षण प्रशिक्षण संचालनालयाचे संचालक सतीश सूर्यवंशी, मेरीको लिमिटेडचे अध्यक्ष हर्ष मारीवाला, अपग्रेड अँड स्वदेस फाऊंडेशनचे सहसंस्थापक रॉनी स्क्रूवाला, नायकाच्या संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी फाल्गुनी नायर यासह, स्ट्राइड व्हेंचर्स आणि स्ट्राइडवनचे संस्थापक इशप्रीत सिंग गांधी, आयआयटीचे माजी विद्यार्थी कल्याण चक्रवर्ती, गो इंडियाच्या व्यवस्थापकीय संचालक इप्सिता दासगुप्ता, महाराष्ट्रासह देशभरातील तंत्रज्ञान, कृषी, सेवा क्षेत्र, औषधनिर्माण तसेच पर्यटन अशा विविध क्षेत्रांतील एक हजार स्टार्टअप्स या कार्यक्रमात उपस्थित होते. पान २ वर

## () थोडक्यात ()



### मोदी सरकारची आठव्या वेतन आयोगाला मंजुरी

नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत आठव्या वेतन आयोगाच्या स्थापनेला मंजुरी देण्यात आली आहे. दरम्यान या आठव्या वेतन आयोगामुळे १.२ कोटींहून अधिक केंद्रीय कर्मचारी आणि निवृत्तीवेतनधारकांच्या वेतन आणि निवृत्तीवेतनामध्ये सुधारणा होणार आहे.

याबाबत माहिती देताना केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी, आठव्या वेतन आयोगाच्या शिफारशी पुढील वर्षी सादर केल्या जाणार असल्याचे स्पष्ट केले आहे. सातव्या वेतन आयोगाची मुदत ३१ डिसेंबर २०२५ रोजी संपत असल्याने केंद्रीय सरकारी कर्मचारी या संदर्भातील घोषणा होण्याची आतुरतेने वाट पाहत होते.

### सैफवर हल्ला करणाऱ्या आरोपीचा फोटो समोर, लोकेशनही सापडलं!



मुंबई : बॉलीवूड अभिनेता सैफ अली खानवर चाकूने जीवघेणा हल्ला करणाऱ्या आरोपींची ओळख अखेर पटली आहे. तसंच त्यांचा ठावठिकाणा माहिती करण्यातही पोलिसांना यश आले आहे.मिळालेल्या माहितीनुसार, हल्लेखोराचा चेहरा सीसीटीव्ही कॅमेरामध्ये कैद झाला आहे. पळून जाताना पायऱ्यांवरुन खाली उतरत असतानाचा त्याचा फोटो समोर आला आहे. तसेच आरोपी प्रभादेवी परिसरात असल्याची माहिती समोर आली आहे. त्या दिशेने पोलिसांचा शोध सुरु आहे. अभिनेता सैफ अली खानवर झालेल्या हल्ल्यात वांद्रे पोलिसांनी भारतीय न्याय संहिता कलम ३११, ३१२, ३३१(४), ३३१(६), ३३१(७) अंतर्गत केला गुन्हा दाखल केला आहे. दरोडा, प्राणघातक शस्त्रांसह दरोडा, घरात बेकायदेशीरपणे घुसणे (हाऊस ट्रेसपास), घरफोडी तसेच रात्रीच्या वेळी घरफोडी करण्याच्या कलमांतर्गत गुन्हा दाखल केला आहे.



## विरार फलाटावरून बाहेर पडण्यासाठी खासगी जागेतून नवीन रस्ता; अडथळ्यातून प्रवाशांची सुटका

● वसई, सतीश सोनावणे :

विरार स्थानकाच्या पश्चिमेकडे असलेल्या गर्दी आणि अडथळ्यातून बाहेर पडणे आता सोयीचे झाले आहे. पश्चिम रेल्वेने विरारच्या फलाट क्रमांक २ मधून बाहेर जाण्यासाठी रस्ता तयार करून दिला आहे. फलाटाला लागून असलेल्या ठाकूर आर्केडच्या खासगी जागेतून हा रस्ता काढला आहे. यामुळे प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला आहे. विरार रेल्वे स्थानकाच्या पश्चिमेकडून बाहेर पडणे प्रवाशांसाठी मोठे दिव्य असतं. पश्चिमेला मुळात रस्ता अरुंद आहे. त्यात फेरिवाल्यांचे अतिक्रमण आणि रिक्षाचालकांनी जागा व्यापलेली असते. त्यामुळे स्थानकातून बाहेर पडताना प्रवाशांन मोठी कसरत करावी लागते. त्यातच विरार स्थानकाच्या पुनर्निर्माणाचे काम सुरू आहे. यामुळे फलाटावरून पश्चिमेकडे बाहेर निघण्यासाठी प्रवाशांना खूप अडचणी सहन कराव्या लागतात आणि त्यात वेळ जाते. पान २ वर

## एकाच दिवशी एकाच वेळी २ लाख विद्यार्थ्यांनी दिली रामायण, महाभारतावर परीक्षा

### मुस्लिम आणि ख्रिश्चन धर्मीय विद्यार्थ्यांचाही लक्षणीय सहभाग

● मुंबई, विशाल पाटील



संस्कृती संवर्धन प्रतिष्ठानच्या वतीने रामायण, महाभारतावर आधारित परीक्षा आयोजित केली होती. महाराष्ट्राच्या विविध जिल्ह्यातील दोन हजाराहून अधिक शाळांमधील तब्बल दोन लाख विद्यार्थ्यांनी परीक्षेत सहभाग घेतला होता. गुरुवार, दि. १६ जानेवारी रोजी, एकाच दिवशी एकाच वेळी संपन्न झालेल्या या परीक्षांचे नियोजन आणि कार्यवाही करण्यासाठी तीन हजार स्वयंसेवक यात स्वयं स्फूर्तीने सहभागी झाले होते. विशेष म्हणजे या परीक्षेत मुस्लिम आणि ख्रिश्चन धर्मीय विद्यार्थ्यांचा लक्षणीय सहभाग असून यातील अनेक विद्यार्थी सुवर्णपदकाचे मानकरी देखील ठरले आहेत.

कथा पुस्तकांच्या आधारे तसेच दृकश्राव्य पद्धतीने सहभागी शाळांमधील विद्यार्थ्यांना दर आठवड्याला कथाकथन केले जाते. महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण खात्याने जाहीर केलेल्या''आनंदी शनिवार''या संकल्पने अंतर्गत रामायण, महाभारत आणि संतांच्या कथा विद्यार्थ्यांना सांगितल्या जातात. सदर उपक्रमात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी आधार म्हणून ६० गुणांच्या वस्तुनिष्ठ परीक्षेचे आयोजन एकाच वेळी सर्व सहभागी शाळांमध्ये करण्यात येते. परीक्षेतील गुणांच्या आधारावर प्रत्येक इयत्तेच्या प्रथम क्रमांकाला सुवर्णपदक देऊन गौरविण्यात येते. शालेय विद्यार्थ्यांना रामायण-महाभारताची ओळख व्हावी, भारतीय जीवन मूल्यांचे संचित आजच्या पिढीसमोर जावे या हेतूने गेली २१ वर्ष हा संस्कार यज्ञ सुरू आहे. मुंबई कोकणपट्टयातील ११०७ शाळा, पश्चिम महाराष्ट्रातील १५७ शाळा, विदर्भातील ३७७ शाळा आणि देवगिरी-छत्रपती संभाजीनगर पट्टयातील ४३४ शाळांचे विद्यार्थी या परीक्षेत सहभागी झाले होते. सदर उपक्रम मराठी, हिंदी, इंग्रजी आणि गुजराती अशा चार भाषांमध्ये तयार करण्यात आला आहे.



## अवैध वाळू उपसा विरोधात तोंडवळी ग्रामस्थांचे नदीपात्रात उतरुन आंदोलन

● सिंधुदुर्ग, दिगंबर जाधव :

मालवण तालुक्यातील तोंडवळी गावातील ग्रामस्थांनी अवैध वाळू उपसा बंद करण्याच्या मागणीसाठी गड नदीच्या पात्रात उतरुन साखळी उपोषण सुरु केले आहे. या आंदोलनामुळे संपूर्ण तालुक्यात खळबळ माजली आहे. गेले अनेक दिवस गड नदीच्या पात्रातून कालावल, हडी तसेच तोंडवळी गावच्या नदीपात्रातून शेकडो मजुरांच्या साहाय्याने रात्रंदिवस अवैध वाळू उपसा करण्यात येत आहे. ही बाब तोंडवळी ग्रामस्थांनी वेळोवेळी सातत्याने लेखी पत्रव्यवहार करून मालवणचे तहसीलदार, प्रांताधिकारी तसेच सिंधुदुर्ग जिल्हाधिकारी यांच्या कानी घातली होती. या अधिकाऱ्यांकडे प्रत्यक्ष तक्रारीही करण्यात आल्या आहेत. असे असतांनाही वाळू माफियांच्या विरोधात कोणतीही कारवाई करण्यात आली नाही. स्थानिक महसूल यंत्रणा ग्रामस्थांच्या तक्रारींकडे काणाडोळा करीत आहे. पान २ वर

## मुलभूत हक्कापासून वंचित असलेले ग्रामपंचायत कर्मचारी आक्रमक...

### १ फेब्रुवारी पासून बेमुदत संपावर जाण्याचा इशारा




● पालघर, सुचिता सोनावणे:

जिल्ह्यात ४७३ ग्रामपंचायत असून त्यात काम करणाऱ्या ८००० पेक्षा जास्त कर्मचाऱ्यांना गेला पाच महिन्यापासून वेतन मिळाले नसल्यामुळे याच कर्मचाऱ्यांनी थेट जिल्हा परिषद गाठली आहे.

अनेक कर्मचाऱ्यांना आवश्यक कागदपत्रांची उपलब्धता करून देणे करोना काळात केलेल्या कामाचा अतिरिक्त भत्ता देणे अशा अनेक मागण्यांना वाचा फोडण्यासाठी निवेदन देण्यात आले असून तातडीने या मागण्या मान्य न केल्यास १ फेब्रुवारी पासून बेमुदत संपावर जाण्याचा इशारा दिला आहे.

जिल्ह्यात ४७३ ग्रामपंचायत आहेत त्यामध्ये ८००० पेक्षा अधिक कर्मचारी कार्यरत आहेत या ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना किमान वेतनाच्या ५०% रक्कम राज्य सरकारकडून प्राप्त होत असते तर उर्वरीत ५०% रक्कम ग्रामपंचायत देते मात्र जिल्ह्यातील ग्रामीण भागातील काही ग्रामपंचायतीचे उत्पन्न अत्यल्प असल्याने शासकीय अनुदानावरच त्यांचा अवलंबून राहावे लागते करोना काळात रात्रंदिवस राबणाऱ्या कर्मचाऱ्यांना अतिरिक्त कामाचा मोबदला म्हणून प्रत्येक कर्मचाऱ्याला एक हजार रुपये प्रति महिना भत्ता राज्यात अनेक ग्रामपंचायतीकडून कर्मचाऱ्यांना देण्यात आला मात्र पालघर जिल्ह्यातील बहुतांश कर्मचाऱ्यांना १९ महिन्याचा विशेष प्रोत्साहनपर भत्ता पासून वंचित ठेवण्यात आले आहे. ती रक्कम जिल्हा परिषदेने तातडीने अदा करावी अशी मागणी ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत कर्मचारी संघटनेने केली आहे. पान २ वर




### चौकशी फेऱ्यात अडकवून कर्मचाऱ्यांना धमकावणी

दरम्यान बोईसर ग्रामपंचायतीत काम करणारे परीक्षीत ठाकूर यांच्याकडे घरपट्टी आकारणी, कमी वाढ करणे, रद्द करणे या संदर्भात संगणकावर कोड (पासवर्ड) देण्यात आले नसताना पालघर पंचायत समितीकडून एकतर्फी चौकशी करून त्यांच्याविरुद्ध कारवाई करण्यात आली या प्रकरणात खरा दोषी मोकाट असून या प्रकरणी पुन्हा एकदा चौकशी करावी या करिता संघटनेने जिल्हा परिषदेचे लक्ष वेधले आहे.

## कोल्डप्ले संगीत कार्यक्रमाला लहान मुलांना घेऊन जाण्यावर निर्बंध

● नवी मुंबई, भावना जैन :

नवी मुंबईत प्रथमच जागतिक कीर्तीच्या 'कोल्डप्ले' या संगीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. १८ ते २१ जानेवारी दरम्यान होणाऱ्या या कार्यक्रमाला अनेक महत्त्वाच्या व्यक्ती उपस्थित राहणार असून जागतिक कीर्तीच्या कलावंतांचा सहभाग या कार्यक्रमात असणार आहे. या संगीत कार्यक्रमाला लहान मुलांना घेऊन जाण्यावर जिल्हा बालसंरक्षण विभागाकडून बंदी घालण्यात आली आहे. लहान मुलांना संगीत कार्यक्रमातील आवाजामुळे होणारा त्रास लक्षात घेता ही आयोजकांना अधिसूचना जाहीर करण्यात आली आहे. 'कोल्डप्ले' हा संगीत कार्यक्रम नवी मुंबईतील डॉ. डी. वाय. पाटील स्टेडियमवर आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमानिमित्त मोठ्या प्रमाणावर गर्दी होण्याचा अंदाज व्यक्त होत आहे. संगीत क्षेत्रासह अन्य क्षेत्रातील अनेक मान्यवरांची उपस्थिती या कार्यक्रमाला असणार आहे. कार्यक्रमनिमित्त येणाऱ्या नवी मुंबईत हजारो वाहनांची भर या दिवसांत पडणार आहे. कार्यक्रमा दिवशी स्टेडियमला येणारे कलावंत व महत्वांच्या




व्यक्ती व प्रेक्षक यांच्या सुरक्षेच्या कारणास्तव आणि वाहतूक कोंडी होऊ नये, यासाठी नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत सर्व प्रकारच्या जड-अवजड वाहनांना ये-जा करण्यास तसेच पार्किंग करण्यास मनाई आदेश देण्यात आले आहेत. कार्यक्रमात कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी विविध खबरदारी घेत असताना आता या संगीत कार्यक्रमाला लहान मुलांना घेऊन जाण्यावर निर्बंध लावण्यात आले आहे. याबाबत जिल्हा बाल संरक्षण विभागाकडून आयोजकांना नोटीस बजावण्यात आली आहे. कार्यक्रमाच्या ठिकाणी आवाजाची पातळी १२० डेसिबल पेक्षा अधिक राहणार असून व्यासपिठावर मोठ्या प्रमाणात विद्युत रोषणाई असणार आहे. यामुळे लहान मुलांच्या कानाला आणि डोळ्यांना त्रास होईल.

# पर्यावरणपूरक उत्सव साजरे करण्यासाठी महापालिका मूर्तीकारांना पूर्ण सहकार्य करणार

■ ठाणे महापालिकेने दिली जागा, शाडूची माती पुरवण्याची ग्वाही
■ अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी आणि प्रशांत रोडे यांनी साधला संवाद





**ठाणे (रोहित जैसवार) :** पर्यावरणपूरक उत्सव साजरे करणे ही समाज म्हणून आपली सगळ्यांची अत्यावश्यक गरज आहे. त्यामुळे आजवरप्रमाणेच मूर्तीकारांनी महापालिकेस सहकार्य करावे. त्यासाठी मूर्तीकारांना आवश्यक असलेली जागा, शाडूची माती यांची उपलब्धता महापालिकेकडून करण्यात येईल, अशी ग्वाही ठाणे महापालिकेच्या वतीने मूर्तीकारांसोबत गुरूवारी झालेल्या बैठकीत देण्यात आली.

पर्यावरणपूरक सण आणि उत्सव साजरे करण्याबाबत मा. उच्च न्यायालय, केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी वेळोवेळी मार्गदर्शक तत्त्वे आखून दिली आहेत. त्याअनुषंगाने, मूर्तीकारांशी चर्चा करण्यासाठी ठाणे महापालिकेच्या पर्यावरण विभागाने गुरूवारी नरेंद्र बल्लाळ सभागृह येथे बैठकीचे आयोजन केले होते. या बैठकीत, ठाणे महापालिका क्षेत्रातील मूर्तीकार संघटना, गणेशोत्सव समन्वय समिती, स्वयंसेवी संस्था यांच्याशी महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त (१) संदीप माळवी आणि अतिरिक्त आयुक्त (२) प्रशांत रोडे यांनी संवाद साधला. त्याप्रसंगी उपायुक्त (पर्यावरण विभाग) डॉ. पद्मश्री बैनाडे, उपायुक्त (अतिक्रमण) शंकर पाटोळे, मुख्य पर्यावरण अधिकारी मनीषा प्रधान, विधि अधिकारी मकरंद काळे उपस्थित होते.

सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या मूर्ती शाडूच्याच असाव्यात असे आता स्पष्ट निर्देश आहेत. त्यासंदर्भात, मूर्तीकारांशी चर्चा करून त्यांच्या समस्या जाणून घेण्याचे निर्देश महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी दिले होते. म्हणून जानेवारी महिन्यातच यासंदर्भात चर्चा घडवून आणल्याचे अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी यांनी स्पष्ट केले. सगळयांच्या आरोग्याचा, प्रदूषणाचा हा विषय असल्याने त्यातून मार्ग कसा काढायचा, सामंजस्याने त्यावर काय तोडगा काढता येईल यासाठी ही बैठक असल्याचे माळवी यांनी सांगितले.

मूर्ती बनविण्यासाठी जागा, शाडूची माती, विक्रीसाठी प्रभागनिहाय जागा महापालिकेमार्फत उपलब्ध करून दिली जाणार आहे. आपण २००५पासून कृत्रिम तलावांची विसर्जन व्यवस्था उभी करून सगळयांसाठी ठाणे शहराने आदर्श घालून दिला आहे. त्याच धर्तीवर पीओपीच्या ऐवजी शाडूच्या मूर्ती करण्यातही ठाण्यातील मूर्तीकारांनी पुढाकार घ्यावा. त्यासाठी आवश्यक ते सर्व सहकार्य महापालिका करेल, असे माळवी यांनी सांगितले.

तर, मूर्तींचे विसर्जन व्यवस्थित व्हावे. त्यात त्यांना काही इजा पोहोचू नये, यासाठी आपण सगळयांनीच प्रयत्न करण्याची गरज आहे. हा वैयक्तिक विषय नसून जनहिताचा आहे. त्याचा आपण मान राखायला हाव. मूर्तीकारांचे कोणतेही नुकसान होऊ नये, अशी प्रशासनाची भूमिका आहे. त्यामुळेच उत्सवाच्या खूप आधीच, जानेवारी महिन्यात बैठक घेत असल्याचे अतिरिक्त आयुक्त (२) प्रशांत रोडे यांनी स्पष्ट केले.

गेल्या वर्षी गणेशोत्सवात आणलेल्या मूर्तीपैकी ३० टक्के मूर्ती या शाडूच्या मातीपासून बनवलेल्या होत्या. महापालिकेने पर्यावरणपूरक उत्सवासाठी प्रदर्शन आयोजित केले होते. तसेच, शाडूची माती व जागाही उपलब्ध करून दिली होती. त्याचबरोबर, पर्यायी विसर्जन व्यवस्थाही केली होती, अशी माहिती मुख्य पर्यावरण अधिकारी मनीषा प्रधान यांनी दिली.

या बैठकीत, जनहित याचिकाकर्ते रोहित जोशी यांनी कायद्याची लढाई सुरूच राहील, पण आपण सगळ्यांनी समंजसपणे वागून पुढील पिढ्यांचा विचार करून निर्णय घ्यायला पाहिजे. ठाणे खाडी क्षेत्र हे रामसार क्षेत्र जाहीर झाले असल्याने आपली जबाबदारी वाढली आहे, असे मत मांडले.

मूर्तीकार संघटनेतर्फे विजय बोळींजकर यांनी हळूहळू शाडूच्या मूर्तींचा प्रसार होत राहील, असे सांगितले. तसेच, याविषयी न्यायालयात मूर्तीकारांची बाजू मांडत असल्याचीही माहिती दिली.

ठाणे गणेशोत्सव समन्वय समितीचे अध्यक्ष समीर सावंत, तसेच, शुभम चिखले, मंगेश पंडित, साक्षी गांधी, नागोठणेकर यांनी मूर्तीकारांसमोर असलेले प्रश्न या बैठकीत मांडले. बाहेरून येणाऱ्या मूर्ती, उत्सवापूर्वी सर्वत्र लागणारे मूर्ती विक्रीचे स्टॉल्स, भाविकांची पसंती आदी मुद्दे त्यांनी उपस्थित केले. शाडूच्या मूर्ती बनविण्यास लागणारा वेळ, त्याची घ्यावी लागणारी काळजी आदी विषय उपस्थित केले. तसेच, शाडूच्या मूर्तींची उपलब्धता, त्यात होत असलेले प्रयोग, मूर्तींसाठी भाविकांकडून स्वीकारले जाणारे इतर पर्याय यांचीही सकारात्मक चर्चा या बैठकीत झाली.

# जिल्हा परिषद ठाणे अंतर्गत क्रीडा महोत्सवाचे आयोजन

## मानसिक व शारीरिक आरोग्यासाठी मैदानी खेळ गरजेचे- मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे





**ठाणे (सम्यक कासारे) -** जिल्हा परिषद ठाणे अंतर्गत अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी क्रीडा महोत्सवाचे आयोजन आज, दि. १६ जानेवारी रोजी पलावा सिटी, कल्याण येथे करण्यात आला होता. क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे व क्रीडा क्षेत्रातील टेबल टेनिसपटू शिवप्रिया यांच्या हस्ते मशाल पेटवून करण्यात आली. जिल्हा परिषदेच्या अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून सर्वांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घ्यावा, असे आवाहन यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी उपस्थित सर्वांना केले. तसेच जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांसाठी नवीन खेळांचे आयोजन करण्यात आले असून १८ विविध मैदानी खेळ तसेच इनडोअर गेम (बैठे खेळ) यांचे नियोजन उपमुख्य कार्यकारी अधिकारी अविनाश फडतरे यांनी उत्तम केले असल्याने कौतुक केले. तसेच मानसिक व शारीरिक आरोग्यासाठी मैदानी खेळ गरजेचे असल्याचे मत व्यक्त केले. प्रकल्प संचालक धायादेवी शिसोदे यांनी क्रीडा स्पर्धा व कलाविष्कार अधिकारी व कर्मचारी यांच्या विविध गुणांना वाव देण्यासाठी महत्त्वाचे असून सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मोठ्या उत्साहात सहभागी होऊन खेळांचा आनंद घ्यावा, अशा शुभेच्छा दिल्या. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अजिंक्य पवार यांनी आरोग्य सुदृढ राहण्यासाठी तसेच अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी असे कार्यक्रम आयोजित करून खेळाचा आनंद घेणे महत्त्वाचे आहे. आरोग्याची काळजी घेण्यासाठी तसेच रोजच्या कामाचा ताण विविध खेळ खेळून आनंद व्यक्त करण्यासाठी आवश्यक आहे, असे प्रतिपादन यावेळी केले. उप मुख्य कार्यकारी अधिकारी अविनाश फडतरे प्रास्ताविक करताना म्हणाले की क्रीडा महोत्सव आयोजित करण्यासाठी स्टेट बँक ऑफ इंडिया, इंडियन बँक व बँक ऑफ बडोदा यांच्या सौजन्याने उत्तम नियोजन अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी करणे शक्य झाले आहे. तसेच सर्व विभाग प्रमुख यांनी मोलाचे योगदान दिल्याबद्दल आभार व्यक्त केले. सर्वांनी सहभाग नोंदवण्यासाठी व खेळांचे आनंद घेण्यासाठी आवाहन केले. उप मुख्य कार्यकारी अधिकारी ग्रामपंचायत विभाग श्री. प्रमोद काळे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी श्री. वैजनाथ बुरुडकर, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग प्रमुख संदिप चव्हान, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे, शिक्षणाधिकारी माध्यमिक ललिता दहितुले, शिक्षणाधिकारी प्राथमिक बाळासाहेब राक्षे, महिला व बाल विकास विभाग प्रमुख संजय बागुल, बांधकाम विभाग प्रमुख संदिप चव्हाण, जिल्हा कृषी अधिकारी एम. एम. बाचोटीकर, सर्व तालुकास्तरीय गट विकास अधिकारी व विभाग प्रमुख तसेच सर्व अधिकारी व कर्मचारी आदी उपस्थित होते.

# बेरोजगार उमेदवारांसाठी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागांतर्गत इस्त्राईल येथे रोजगाराची संधी

**पालघर (सुचिता सोनावणे) :** महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाअंतर्गत पालघर, जिल्ह्यातील उमेदवारांना इस्त्राईल येथे रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यात येत आहे. इस्त्राईल मधील नॉन वॉर झोनमध्ये घरगुती सहाय्यक (HOME BASED CAREGIVER) या क्षेत्रात युवक युवतींना रोजगाराची संधी आहे जिल्ह्यातील उमेदवारांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त रविंद्र सुरवसे यांनी केले आहे.

इंग्रजी भाषेचे सामान्य ज्ञान असणाऱ्या व २५ ते ४५ वर्षे वयोगटातील उमेदवार या योजनेमध्ये सहभागी होण्यास पात्र आहेत. सोबतच उमेदवारांकडे काळजीवाहू (घरगुती सहाय्यक) सेवांसाठी निपुण/ पारंगत, भारतातील नियामक प्राधिकरणाद्वारे मान्यताप्राप्त असलेले व किमान ९९० तासांचा कोर्स पूर्ण केलेले प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे (ऑन जॉब ट्रेनिंग सह). भारतीय प्राधिकरणाद्वारे प्रदान केलेल्या मिडवाइफरी मधील प्रशिक्षण, संबंधित भारतीय अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली किवा नर्सिंग, फिजिओथेरपी, नर्स असिस्टंट मधील प्रशिक्षण पूर्ण असणे आवश्यक, तसेच जीडीए/एएनएम/जीएनएम/ बीएससी नर्सिंग/ पोस्ट बीएससी नर्सिंगची शैक्षणिक पात्रता असणे आवश्यक आहे.

इस्त्राईल मध्ये नोकरी मिळवण्यासाठी महाराष्ट्रातच निवड प्रक्रिया व नियुक्तीचे वाटप, आरोग्य तपासणी, व्हिजा आणि पासपोर्टसाठी संपूर्ण मार्गदर्शन व मदत विभागाकडून केली जाणार आहे. मेडिकल विमा, राहण्याची आणि जेवणाची सोयही असणार आहे. पात्र उमेदवारांना रु.१ लाख ३१ हजार पर्यंत मासिक वेतन दिले जाईल. जिल्ह्यातील जास्तीत जास्त इच्छुक पात्र उमेदवारांनी www.maharashtrainternational.com या अधिकृत संकेतस्थळाला भेट देऊन आपली माहिती भरावी अधिक माहितीसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, पालघर, जिल्हा मुख्यालय परीसर,प्रशासकीय ईमारत "ब",पहिला मजला, कक्ष क्रं १०९, पालघर-बोईसर रोड,कोळगाव,ता.जि.पालघर (प) ४०१४०४ या कार्यालयाशी संपर्क साधावा. दूरध्वनी क्रमांक ०२५२५- २९९८१२. Email- palgharrojgar@gmail.com

# शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारासाठी २६ जानेवारी पर्यंत अर्ज सादर करावे

**पालघर (सतीश सोनावणे) -** महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा विभागाद्वारा राज्यातील सर्वोत्कृष्ट क्रीडापटूंना व क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना क्रीडा विभागाचा प्रतिष्ठेचा "शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार प्रदान करण्यात येतो. क्रीडा क्षेत्रात विशेष उल्लेखनीय कार्य करणा-या ज्येष्ठ क्रीडा महर्षिकरीता जीवन गौरव पुरस्कार, क्रीडा मार्गदर्शकांकरिता उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक/जिजामाता राज्य क्रीडा पुरस्कार (महिला क्रीडा मार्गदर्शक), शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (खेळाडू), शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (साहसी उपक्रम), शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (दिव्यांग खेळाडू) असे पुरस्कार प्रदान करण्यात येतात. त्यानुसार दि. २९ डिसेंबर, २०२३ व दि. २५ जानेवारी, २०२४ च्या शासन निर्णयानुसार शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार सुधारीत नियमावली, २०२३ विहीत करण्यात आली आहे. या नियमावलीनुसार सन २०२३-२४ या वर्षाच्या पुरस्कारासाठी राज्यातील क्रीडा मार्गदर्शक, खेळाडू, दिव्यांग खेळाडू व साहसी उपक्रमात सहभागी झालेले खेळाडू/व्यक्ती यांच्याद्वारा दि. २६ जानेवारी, २०२५ पर्यंत ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

अर्ज सादर करणा-या इच्छूक क्रीडा मार्गदर्शक, खेळाडू, साहसी उपक्रम व दिव्यांग खेळाडू यांनी विहीत मुदतीत क्रीडा विभागाच्या https://sports.maharashtra.gov.in संकेतस्थळावर स्क्रोलिंग लिक (Scrolling Link) मध्ये उपलब्ध करून दिलेल्या लिंकवर दि २६ जानेवारी, २०२५ या कालावधीत व दि. २६ जानेवारी, २०२५ रोजी रात्री १२:०० वाजेपर्यंत फक्त ऑनलाईन अर्ज सादर करण्यात यावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी, सुहास व्हनमाने यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे केले आहे.

# आत्मा मालिक क्रीडा संकुलात राज्य क्रीडा दिवस संपन्न!



**वासिंद (आकाश कांबळे) -** येथील मोहिली-अघई येथील विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट संचलित, आत्मा मालिक शैक्षणिक व क्रीडा संकुलात तालुकास्तरीय मिनी मॅरेथॉन व कुस्ती स्पर्धेचे आयोजन करुन राज्य क्रीडा दिवस संपन्न झाला.

शहापूर तालुक्यातील मोहिली-अघई येथील आत्मा मालिक शैक्षणिक व क्रीडा संकुलात परमपूज्य आत्मा मालिक माऊलींच्या कृपाशीर्वादाने संत भारत माता व संत परिवाराच्या प्रेरणेतून व संस्थेचे अध्यक्ष नंदकुमार सुर्यवंशी व समस्त विश्वस्त मंडळ व संकुलाचे कार्याध्यक्ष तथा विश्वस्त उमेश जाधव साहेब यांच्या मार्गदर्शनाने क्रीडा व युवक सेवा संचलनालय, पुणे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा क्रीडा परिषद ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तालुकास्तरीय मिनी मॅरेथॉन व कुस्ती स्पर्धेचे आयोजन करुन राज्य क्रीडा दिवस साजरा करण्यात आला.

स्वर्गीय खाशाबा जाधव यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. या स्पर्धेत एकूण ७५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या कार्यक्रमावेळी संस्थेचे कार्याध्यक्ष उमेश जाधव, स्थानिक शाखा सदस्य अनंतजी गायकवाड, प्रवीण मोरे व्यवस्थापक उल्हास पाटील, आत्मा मालिक इंग्लिश मीडियम स्कूलचे प्राचार्य पंकज बडगुजर, आत्मा मालिक इंटरनॅशनल स्कूलचे प्राचार्य कैलास थोरात, उपप्राचार्य दिपाली खांडगे, वसतिगृह विभागाचे व्यवस्थापक बिकास रॉय आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक क्रीडा विभाग प्रमुख पुरुषोत्तम पानबुडे यांनी केले. स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांना पाहुण्यांच्या हस्ते प्राविण्य प्रमाणपत्र व पदक देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाची सांगता सामूहिक ध्यानाने करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी क्रीडा विभागातील सर्व क्रीडा शिक्षक-शिक्षिकेतर व कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले होते.

# ऑलिंपिक वीर दिवंगत खाशाबा जाधव यांचा जन्मदिन १५ जानेवारी हा राज्य क्रीडा दिन म्हणून भिवंडी महानगरपालिकेच्या वतीने साजरा






**भिवंडी (विवेक गुंजाळ) -** महाराष्ट्र शासनाच्या शासन निर्णयानुसार ऑलिंपिक वीर दिवंगत खाशाबा जाधव यांचा जन्मदिन १५ जानेवारी हा राज्य क्रीडा दिन म्हणून साजरा करण्याबाबत निर्देश दिले होते. त्यानुसार क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्यावतीने भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेतर्फे ऑलिंपिकवीर दिवंगत खाशाबा जाधव यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून १५ जानेवारी "राज्य क्रीडा दिना" निमित्त भिवंडी महानगरपालिका कार्यक्षेत्रातील १४ व १७ वर्ष मुले वयोगटातील जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेचे आयोजन स्व. राजय्या गाजेंगी हॉल, कोंबडपाडा, भिवंडी येथे सकाळी ११:०० वाजता मा. प्रशासक तथा आयुक्त अजय वैद्य यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी त्यांनी ऑलिंपिकवीर खाशाबा जाधव यांचेबद्दल नमूद केले की खाशाबा जाधव यांचा जन्म दिनांक १५ जानेवारी १९२६ मध्ये गोळेश्वर सातारा येथे झाला. खाशाबा हे ख्यातनाम पैलवान दादासाहेब जाधव यांचे सर्वात लहान चिरंजीव असून त्यांनी आठ वर्षाचे असतानाच त्यांचे भागातील प्रसिद्ध चॅम्पियनला दोन मिनिटात लोळवण्याचा पराक्रम केला होता. सन १९५२ मध्ये हेलसिंकी ऑलम्पिक स्पर्धा मध्ये ५२ किलोग्रॅम वजन गटात फ्रीस्टाइल प्रकारांतर्गत कांस्य पदक जिंकले. हे पदक स्वतंत्र भारतातील पहिले वैयक्तिक पदक होते. सन १९५५ मध्ये खाशाबा जाधव हे महाराष्ट्र पोलीस दलात पोलीस उप निरीक्षक म्हणून रुजू झाले. त्यांना सन १९९२-९३ मध्ये महाराष्ट्र सरकारने खाशाबा जाधव यांना मरणोत्तर छत्रपती पुरस्कार देऊन सन्मानित केले. तर सन २००० मध्ये भारत सरकारकडून त्यांना मरणोत्तर अर्जुन पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात अशी माहिती सदर प्रसंगी माननीय आयुक्त यांनी उपस्थितांना दिली. त्याचबरोबर खेळाचे महत्व पटवून देत असताना त्यांनी हे देखील नमूद केले की विविध खेळाला पोषक असं वातावरण तयार व्हावे. त्यातून चांगले खेळाडू तयार होतील. कोणताही क्रीडा प्रकार खेळताना आपल्या शारीरीक व मनाचा व्यायाम हा होत असतो. महानगरपालिकेच्या वतीने अशा विविध प्रकारच्या क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार असले बाबत त्यांनी नमूद केले. राज्य क्रीडा दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय ऑलिंपिकवीर दिवंगत खाशाबा जाधव कुस्ती स्पर्धेत महानगरपालिका कार्यक्षेत्रातील १२५ हून अधिक खेळाडूंनी सदर स्पर्धेमध्ये सहभाग नोंदविला आहे. विजयी खेळाडुंना प्रमाणपत्र, मेडल स्पर्धेच्या ठिकाणी देण्यात आले. भिवंडी शहर प्रत्येक क्षेत्रात आघाडीवर असून क्रीडा क्षेत्रातही अनेक गुणवंत क्रीडा खेळाडू नावारुपाला येतील अशी आशा महानगरपालिका मा. प्रशासक तथा आयुक्त श्री. अजय वैद्य यांनी व्यक्त केली. यावेळी महानगरपालिकेचे अतिरीक्त आयुक्त देविदास पवार, विठ्ठल डाके, उप आयुक्त (मुख्यालय) शैलेश दोंदे, उपायुक्त (क्रीडा विभाग) डॉ. अनुराधा बाबर, उपायुक्त (समाज कल्याण) श्रीमती प्रणाली घोंगे, शहर अभियंता जमिल पटेल, अग्निशामक विभाग प्रमुख राजेश पवार, क्रीडा विभाग प्रमुख मिलिंद पळसुले, क्रीडा अधिकारी शरद कलावंत, मुख्य उद्यान अधिक्षक निलेश संख्ये, वाहन विभाग प्रमुख प्रशांत संख्ये, महानगरपालिकेचे अन्य अधिकारी, जिल्हा कुस्ती तालिम संघाचे उपाध्यक्ष श्रीराम पाटील व अन्य क्रीडा समिती सदस्य व शिक्षक उपस्थित होते.

# डॉक्टर ते अभिनेत्री अशी झाली इंडस्ट्रीत एन्ट्री

साऊथच्या टॉप आणि सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीबद्दल बोलायचं झालं तर साई पल्लवीचं नाव तोंडावर येते. निरागस चेहरा आणि डोळ्यात मस्ती. अभिनेत्री साई पल्लवी तिच्या सौंदर्यासाठी, दमदार अभिनयासाठी ओळखली जाते. तिची मोठी फॅन फॉलोइंग आहे. साई पल्लवी आज सिनेसृष्टीतील टॉपच्या अभिनेत्रींपैकी एक असली, तरी तिला अभिनेत्री नाही तर डॉक्टर बनायचं होतं. साई पल्लवीकडे मेडिकलची डिग्रीदेखील आहे. पण तिचा डॉक्टर ते अभिनेत्री हा प्रवास कसा होता जाणून घेऊया.

साई पल्लवी आज सिनेसृष्टीतील टॉपच्या अभिनेत्रींपैकी एक असली, तरी तिला अभिनेत्री नाही तर डॉक्टर बनायचं होतं. साई पल्लवीकडे मेडिकलची डिग्रीदेखील आहे. अभिनेत्री जर अभिनय क्षेत्रात आली नसती, तर एक कार्डियोलॉजिस्ट असती. २०१४ मध्ये ज्यावेळी ती शिक्षण घेत होती, त्यावेळी तिला प्रेमम सिनेमातील मलार या भूमिकेची ऑफर आली होती. या सिनेमातील भूमिकेसाठी तिला साउथचा फिल्मफेयर अवॉर्डदेखील मिळाला होता.



साई पल्लवीने २०१५ मध्ये मल्याळम चित्रपट 'प्रेमम' द्वारे पदार्पण केले, जो एक सुपर-डुपर हिट होता आणि त्या वेळी दुसरा सर्वाधिक कमाई करणारा मल्याळम चित्रपट होता, त्यानंतर सईने कधीही मागे वळून पाहिले नाही आणि अनेक चित्रपट देऊन प्रेक्षकांना प्रभावित केले साऊथ फिल्म इंडस्ट्रीमध्ये साई पल्लवीच्या यशस्वी चित्रपटांमध्ये 'काली' (२०१७), 'मिडल क्लास अब्बाई' (२०१७), 'मारी २' यांचा समावेश आहे. (२०१८), 'अथिरन' (२०१९), 'पावा कढाईगल' (२०२०), 'लव्ह स्टोरी' (२०२१), 'श्याम सिंघा रॉय' (२०२१) आणि 'गार्गी' (२०२२).

आपल्या साधेपणामुळे ती प्रेक्षकांना इतर अभिनेत्रींपेक्षा जास्त जवळची वाटते साईने सध्याच्या कारकिर्दीत मुख्यतः तामिळ, तेलुगू आणि मल्याळम चित्रपटांमध्ये काम केले आहे. चित्रपटसृष्टीत येण्यासाठी विविध प्रकारच्या सर्जरी किंवा काही उपचार घेणाऱ्या अभिनेत्री आजुबाजूला असताना मेकअप न करता साई पल्लवीने आपली वेगळी ओळख निर्माण केली.

साई पल्लवीने एक फेयरनेस क्रिमची जाहिरात नाकारली होती. दोन कोटींची जाहिरात नाकारल्यानंतर अभिनेत्री चर्चेत आली होती. त्याशिवाय ती कश्मीरी पंडित आणि गौरक्षावर वक्तव्य केल्याने वादात अडकली होती. साई पल्लवीचं नेटवर्थ २९ कोटी असल्याची माहिती आहे. अनेक बॉलिवूड अभिनेत्रींनाही मागे टाकत साई पल्लवीने २०२० मधील फोर्ब्सच्या प्रॉमिसिंग कलाकारांच्या यादीत पहिल्या ३० मध्ये जागा मिळवली होती.



## पतीवर झालेल्या हल्ल्याने करीना कपूर चिंतेत

बॉलीवूड अभिनेता सैफ अली खानवर राहत्या घरी मध्यरात्री दरोडेखोरांनी हल्ला केला. या हल्ल्यात सैफ गंभीर जखमी झाला आहे. सध्या त्याच्यावर लीलावती रुग्णालयात उपचार सुरू आहेत. घडलेल्या घटनेनंतर मनोरंजन विश्वात एकच खळबळ उडाली आहे. अशात सध्या सोशल मीडियावर घटनेनंतरचा सैफच्या घराबाहेरील एक व्हिडीओ समोर आला आहे.

दरोडेखोरांनी केलेल्या हल्ल्यात सैफ गंभीर जखमी झाल्याने त्याची पत्नी करीना कपूर खान मोठ्या चिंतेत आहे. या घटनेनंतर करीना आणि घरातील मदतनीस (मोलकरीण) दोघीही घराबाहेर आल्या होत्या. तसेच जमलेल्या अन्य व्यक्तींना याची माहिती सांगत होत्या. घटनेनंतर घराबाहेरील परिस्थितीचा व्हिडीओ समोर आला आहे. विरल भयानी या इन्स्टाग्राम अकाउंटवर हा व्हिडीओ शेअर करण्यात आला आहे.

व्हिडीओमध्ये करीना अस्वस्थ होऊन घराबाहेर फेऱ्या मारताना दिसत आहे. तसेच अन्य व्यक्तींशी संवाद साधत आहे. यावेळी तिने गुलाबी रंगाचे टी-शर्ट आणि सफेद रंगाची पँट घातली आहे. हा व्हिडीओ समोर आल्यावर नेटकऱ्यांनीदेखील यावर अनेक कमेंट केल्या आहेत. सैफ आणि करीनाच्या चाहत्यांनी दोघांविषयी काळजी व्यक्त केली आहे.

'इंडिया टुडे'ने दिलेल्या वृत्तानुसार, वांद्रे येथील सैफच्या राहत्या घरी ही घटना घडली. दरोडेखोरांनी थेट घरात प्रवेश केला, त्यावेळी घरात करीना, तैमुर आणि जेहदेखील होते. या चोरांची मदतनीस (मोलकरीण) बरोबर भांडणं झाली, तिने आरडाओरडा केला, त्यावेळी सैफ तेथे पोहचला. आपल्या कुटुंबाचं रक्षण करण्यासाठी त्याने चोरांशी दोन हात केले. यावेळी त्याच्यावर चाकूने हल्ला झाला. या हल्ल्यात सैफच्या मानेला गंभीर दुखापत झाली आहे. दरम्यान, या घटनेनंतर बॉलीवूडसह दाक्षिणात्य सिनेविश्वातील कलाकारांनी यावर प्रतिक्रिया दिल्या आहेत. तसेच राजकीय वर्तुळातही या घटनेमुळे खळबळ उडाली आहे. आमदार जितेंद्र आव्हाड, खासदार संजय राऊत, आमदार रोहित पवार यांनीही यावर प्रतिक्रिया दिली आहे. त्यासह दाक्षिणात्य अभिनेता ज्युनिअर एनटीआरनेही पोस्ट शेअर करत सैफबद्दल काळजी व्यक्त केली आहे. सदर घटनेनंतर पोलिसांत याबाबत तक्रार दाखल करण्यात आली आहे. पोलिसांना ही माहिती मिळताच त्यांनी तातडीने सैफच्या घरी धाव घेतली तसेच तपासाला वेगाने सुरुवात केली आहे.

## दीपिका अन् प्रियांका चोप्रानंतर दिशाची उंच भरारी



बॉलिवूडची अभिनेत्री दिशा पटानी कायमच तिच्या लूक आणि अभिनयासाठी ओळखी जाते. तिने आजवर अनेक हिट चित्रपट केले आहे. दिशाचा मोठा चाहता वर्ग आहे. तिने आपल्या स्टाइलने चाहत्यांना वेड लावले आहे. तिचा गॅमरस अंदाज पाहून चाहते नेहमीच घायाळ होतात. सध्या अभिनेत्री एका वेगळ्या कारणामुळे चर्चेत आली आहे. सध्या सोशल मीडियावर अभिनेत्री दिशा पटानीचा एक फोटो तुफान व्हायरल होत आहे. यावरून दिशा पटानी आता हॉलिवूडमध्ये पदार्पण करणार असल्याच्या चर्चा रंगल्या आहेत. दीपिका अन् प्रियांका चोप्रानंतर आता दिशा पटानी हॉलिवूडमध्ये झळकणार आहे. शूटिंगच्या सेटवरचा तिचा फोटो सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.दिशा पटानीने मात्र याबाबत अद्याप कोणतीही घोषणा केली नाही आहे. दिशा पटानीने आजवर अनेक वेगवेगळ्या भूमिका साकारल्या आहेत. मात्र या बातमीने दिशाच्या चाहत्यांना आनंद झाला आहे. फोटोमध्ये दिशा पटानी 'फास्ट अँड फ्युरियस' स्टार टायरेस गिब्सन आणि अभिनेता हॅरी गुडविन्स सोबत पाहायला मिळत आहे. हे तिघे सध्या मेक्सिकोतील डुरंगो येथे एका आगामी वेब सीरिजचे शूटिंग करत आहेत.

## राजकुमार हिरानींचा मुलगा 'या' वेब सीरिजमधून अभिनय क्षेत्रात करणार पदार्पण, 'हा' प्रसिद्ध अभिनेता दिसणार खलनायकाच्या भूमिकेत


बॉलीवूडचे प्रसिद्ध दिग्दर्शक राजकुमार हिरानी यांनी 'मुन्नाभाई एमएमबीएस', 'लगे रहो मुन्नाभाई', 'थ्री इडियट्स' अशा प्रसिद्ध चित्रपटांचे दिग्दर्शन केले आहे. त्यांचे अनेक सिनेमे लोकप्रिय असून त्यांच्या सिनेमांनी बॉक्स ऑफिसवर रेकॉर्डब्रेक कमाई केली आहे. आता राजकुमार हिरानी ओटीटीवर पदार्पण करत आहेत. 'प्रीतम पेड्रो' या सिरीजची ते निर्मिती करणार असून यातून त्यांचा मुलगा वीर हिरानी अभिनयक्षेत्रात पदार्पण करणार आहे. यात एक प्रसिद्ध अभिनेता खलनायकाची भूमिका साकारणार आहे. विक्रांत मॅसी असे त्या अभिनेत्याचे नाव आहे. विक्रांतने त्याच्या अभिनय



कौशल्याने चित्रपट आणि टीव्ही मालिकांमध्ये आपली छाप सोडली आहे. २०२४ मध्ये विक्रांतचे 'ब्लॅकआउट', 'फिर आयी हसीन दिलरुबा', 'सेक्टर ३६' आणि 'द साबरमती रिपोर्ट' हे चार चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीस आले. या सर्व चित्रपटांमधील त्याच्या अभिनयाचे खूप कौतुक झाले. यानंतर काही विक्रांतने अलीकडेच त्याच्या कुटुंबाबरोबर वेळ घालवण्यासाठी अभिनयातून काही काळ ब्रेक घेण्याची घोषणा केली होती. मात्र, आता राजकुमार हिरानी यांच्या आगामी वेब सीरिजमध्ये त्याने खलनायकाची भूमिका स्वीकारल्याच्या बातम्या समोर आल्या आहेत.

PeepingMoon च्या वृत्तानुसार, विक्रांत मॅसीने राजकुमार हिरानी यांची पहिली वेब सीरिज 'प्रीतम पेड्रो'मध्ये नायकाची भूमिका नाकारून खलनायकाची भूमिका निवडली आहे. शोच्या शूटिंगच्या वेळापत्रकामुळे त्याने ही निवड केली आहे. 'प्रीतम पेड्रो' सीरिजमध्ये राजकुमार हिरानी यांचा मुलगा वीर हिरानी आणि अर्शद वारसी मुख्य भूमिकेत आहेत. वीर हा टेक-सेव्ही पोलीस अधिकारी म्हणून विक्रांतच्या भूमिकेत दिसणार आहे, तर अर्शद वारसी पारंपरिक तपास पद्धतींवर अवलंबून राहणाऱ्या अनुभवी पोलीस अधिकाऱ्याची भूमिका साकारणार आहे.

## शुभमन गिल, सारा तेंडुलकरच्या डेटिंग रूमर्समध्ये व्हेकेशन PHOTOS झालेत Viral?



टीम इंडियाच्या तरुण खेळाडूंच्या यादीत अव्वल स्थानी असलेला प्रिन्स म्हणजेच, शुभमन गिल आपल्या शानदार खेळीनं त्यानं आधीच अनेकांची मनं जिंकली आहेत. तर, अनेक तरुणींच्या गळ्यातील तो ताईतही बनला आहे. शुभमन गिल जेवढा क्रिकेटसाठी चर्चेत असतो, तेवढाच तो त्याच्या वैयक्तिक आयुष्यामुळेही चर्चेत असतो. शुभमन गिलचं नाव अनेक प्रसिद्ध अभिनेत्रींसोबत जोडलं गेलेलं आहे. असं असलं तरीदेखील, शुभमन गिल कुणाला डेट करतोय, हे अद्याप त्यानं उघड केलेलं नाही. पण, तरीदेखील तो एका मिस्ट्री गर्लसोबत रिलेशनशिपमध्ये असल्याच्या चर्चा रंगलेल्या असतात.

शुभमन गिलचं नाव प्रसिद्ध क्रिकेटर सचिन तेंडुलकरच्या मुलीसोबत जोडलं जातं. दोघांना अनेकदा पॅपाराझींनी स्पॉटही केलं आहे. तेव्हापासूनच दोघांच्या रिलेशनशिपबाबत चर्चा रंगू लागल्या. अशातच सोशल मीडियावर सारा तेंडुलकर आणि शुभमन गिल यांचे व्हेकेशन फोटो सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. आजवर दोघांपैकी कुणीच त्यांच्या नात्याबाबत काहीच बोललेलं नाही. अशातच आता थेट व्हेकेशन फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाल्यामुळे चर्चेचा विषय ठरत आहे. व्हायरल होत असलेल्या फोटोंमध्ये, सारा तेंडुलकर, शुभमन गिलसोबत व्हाईट टी-शर्ट आणि शॉर्ट्स घालून पोज देताना दिसत आहे.

## इलू इलू चित्रपटाचा रंजक ट्रेलर प्रदर्शित


आठवणी म्हणजे कधीही न विसरणारी गोष्ट. गेलेले क्षण परत येत नाहीत पण आपल्याला त्या आपल्या मनाच्या कोपऱ्यात सांभाळून जपून ठेवता येतात. तारुण्यातल्या भावविश्वाचा हळवा कप्पा प्रत्येकाने आपल्या मनाशी जपलेला असतो. यासोबत मैत्री, प्रेम,या सगळयांचा नव्याने अर्थ उमगायला लागलेला असतो. पहिल्या प्रेमाच्या आठवणी प्रत्येकासाठी खास असतात. प्रेमाच्या याच सुरेख आठवणींची गोष्ट घेऊन आलेल्या 'इलू इलू' या मराठी चित्रपटाचा ट्रेलर लाँच सोहळा नुकताच कलाकारांच्या उपस्थित संपन्न झाला. ९० दशकाचा माहोल, विंटेज कार मधून कलाकारांची ग्रँड एंट्री अशा 'फुल ऑन' अंदाजात हा



सोहळा रंगला. फाळके फिल्म्स एण्टरटेन्मेंट प्रॉडक्शन आणि अजिंक्य बापू फाळके दिग्दर्शित 'इलू इलू' हा मराठी चित्रपट ३१ जानेवारीला प्रेक्षकांच्या भेटीला येतोय. प्रेम जगातली सगळ्यात सुंदर भावना. ती शब्दात व्यक्त करणं अवघडच. प्रेम कोणी आणि कोणावर केल यावर ते चूक की बरोबर हे नाही ठरवता येत. प्रत्येकजण आयुष्यात कोणत्या ना कोणत्या वळणावर प्रेमात पडतोच. प्रेमाला वय, काळाचे भान नसते असे म्हणतात.नव्याने प्रेमाची चाहूल लागलेल्या प्रेमाची लव्हेबल गोष्ट 'इलू इलू' चित्रपटात पहाता येणार आहे. नात्यातील हळूवार क्षणांना रेखाटणारा फ्रेश चित्रपट प्रत्येकाला आपल्या पहिल्या प्रेमाची नक्की आठवण करून देईल असा विश्वास दिग्दर्शक अजिंक्य बापू फाळके यांनी याप्रसंगी व्यक्त केला. 'इलू इलू' च्या निमित्ताने वेगळी भूमिका आणि मराठीत काम करायला मिळाल्याचा आनंद एली आवराम हिने यावेळी बोलून दाखविला. बॉलीवूड गाजवलेली प्रसिद्ध अभिनेत्री एली आवराम हिने 'इलू इलू' चित्रपटातून मराठी रुपेरी पडद्यावर पदार्पण केलं आहे. 'मिकी व्हायरस' या चित्रपटाद्वारे हिंदीत दाखल झालेल्या एलीनं आजवर 'किस किस को प्यार करूं', 'नाम शबाना', 'पोस्टर बॉईज', 'बाझार', 'मलंग', 'कोई जाने ना', 'गुडबाय' या हिंदी चित्रपटांसोबतच तमिळ आणि कन्नड चित्रपटांमध्येही अभिनय केला आहे. 'इलू इलू' या चित्रपटात एली 'मिस पिंटो' या मुख्य भूमिकेत झळकणार आहे. ही व्यक्तिरेखा यशस्वीपणे साकारण्यासाठी एलीनं खूप मेहनत घेतली आहे. एली सोबत मीरा जगन्नाथ, श्रीकांत यादव, कमलाकर सातपुते, वीणा जामकर, आरोह वेलणकर, वनिता खरात,अंकिता लांडे, निशांत भावसार, गौरव कलुस्ते, यश सणस, सोहम काळोखे, आर्या काकडे-जोशी, सिद्धेश लिंगायत हे कलाकार चित्रपटात आहेत.'इलू इलू' चित्रपटाची कथा, पटकथा, संवाद नितीन विजय सुपेकर यांचे आहेत. निर्माते बाळासाहेब फाळके आणि हिंदवी फाळके तर सहनिर्माते यश मनोहर सणस आहेत.

## जयंतने सांगितला जान्हवीच्या बर्थडे सीनचा मजेशीर किस्सा

'लक्ष्मी निवास' मालिका आरंभापासूनच काही न काही कारणांनी ती प्रेक्षकांचं लक्ष वेधून घेत आहे. आता कारण आहे ते म्हणजे जयंत आणि जान्हवीच फुलणारं नातं. या जोडीला प्रेक्षकांचं पुरेपूर प्रेम मिळत आहे. मालिकेत जान्हवी-जयंतचा हल्लीच साखरपुडा झाला आणि लगेच जान्हवीचा वाढदिवस आला आहे. जान्हवीची अपेक्षा आहे आपल्या घरी वाढदिवस एकदम छान साजरा केला पाहिजे. हे जयंतला कळलंय आणि तो तिचा वाढदिवस खास बनवण्यासाठी पूर्ण तयारी करतोय. जयंत जान्हवीला बाहेर फिरायला घेऊन जाणार आहे. वाढदिवसाला जयंत तिला अनेक सरप्राईज देणार आहे. जान्हवी आपल्या लग्नाच्या कार्डची डिझाईन फायनल करते. त्यानंतर



सर्व शॉपिंगसाठी जाणार आहेत. श्रीनिवासच्या म्हणजेच बाबांच्या खरेदीमध्ये तडजोड करते, जयंत हे पाहतो. घरी परतल्यावर, जयंत जान्हवीला हवे असलेले सर्व दागिने पाठवतो, ज्यामुळे सगळे आश्चर्यचकित आहेत. जान्हवीच्या इच्छा पूर्ण करण्यासाठी जयंत सर्व काही करणार आहे. तिच्यासाठी वाढदिवसाला क्रूज आणि जेटप्लेन मध्ये तिला फिरायला नेतो. हे सर्व सीन्स शूट करण्यामागचे गंमतशीर किस्से तुम्हीही जाणून घ्यायला उत्सुक असाल म्हणून जयंतची भूमिका साकारत असेलला मेघन जाधव म्हणाला, "जान्हवीच्या बर्थडे सीनचा किस्सा खूप गंमतशीर आहे. पाहिलेतर एक कलाकार म्हणून माझ्यासाठी हा उत्तम अनुभव होता. मी २० वर्षापासून इंडस्ट्री मध्ये काम करत आहे आणि जेव्हा मला कळले की आमच्या मालिकेत क्रूज आणि जेटप्लेनमध्ये शूट करणार आहोत ते ही एका दिवसात तेव्हा मी प्रोडकशनच्या दृष्टिकोनातून विचार करत होतो हे सर्व कसं साध्य केलं जाईल कारण बिलकुल सोपं नव्हतं इतक्या कमी वेळेत सर्व पार पडणं, पण आम्ही ते गाठलं. मला अचानक रात्री कॉल आला की उद्या गोव्याला जायचे आहे, आऊटडोअर मध्ये काही दिवस आधी ठरत आणि कळवल जात पण आमचं अचानक ठरलं. मी लहानपणी गोव्याला गेलो होतो आणि त्यानंतर आता जात होतो तर त्याची उत्सुकता ही होती. याहुन जास्त जबरदस्त मनात भावना ही होती कि आपण फक्त एका दिवसासाठी, एक सीन शूट करायला जात आहोत. मी शूटिंगचे बरेच अनुभव घेतले आहेत. माझ्यासाठी प्रोडकशन टीम कशी सर्व व्यवस्था करते आणि कुठे- कुठे जाऊन लोकेशन शोधून सर्व प्लॅन करते याचा विचार मी करत होतो. आणि मला अभिमान वाटतो की 'लक्ष्मी निवास' महामालिकेमुळे आपण मराठी टेलिव्हिजनवर असे सीन्स आणत आहोत जे आता पर्यंत प्रेक्षकांनी चित्रपटात पाहिले असतील. एक किस्सा तुम्हाला सांगायला आवडेल, मुंबई वरून गोव्याला मी आणि दिव्या एकटे जात होतो आणि मला जान्हवी म्हणजेच दिव्या पुगावकरला पहाटे २:३० वाजता पिकअप करून एअरपोर्टला जायच होते. दिव्या आणि मी ठरवले कि २:ला निघायचे कारण पहाटे ४ च फ्लाईट होत. मी २ वाजता दिव्याला कॉल केला पण ती काही कॉल उचलतच नव्हती. मी थोडा टेन्शन मध्ये आलो, आता इतक्या रात्री कोणाला कॉल करायचा . पण थोड्यावेळाने तिचाच कॉल आला.

**मेष** – आपली मेहनत व दृढनिश्चयामुळे अडचणींवर मात कराल. करियरमध्ये प्रगती होईल. आर्थिक स्थिती सुधारेल.

**वृषभ** – आर्थिक दृष्टिकोनातून चांगल्या घटना घडतील. प्रोजेक्ट्स यशस्वी होतील. परिवारिक संबंध ठीक राहतील.

**मिथुन** – करियरमध्ये आव्हाने असतील, पण बुद्धिमत्तेच्या जोरावर ती पार कराल. प्रेम व परिवारात सामंजस्य राखा.




**कर्क** – आपल्या कार्यक्षेत्रात यश मिळण्याची शक्यता आहे. वैयक्तिक जीवनात शांतता व समजूतदारपणा दाखवाल.

**सिंह** – आपल्या खर्चावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. आपल्या कामात अडचणी आणि संधी दोन्ही येऊ शकतात.

**कन्या** – तुम्ही शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या मजबूत असाल. आपल्या प्रेम जीवनात सकारात्मक बदल होऊ शकतात.

**तुळ** – कामातील दबाव सहजतेने हाताळाल. आरोग्य उत्तम राहील. आर्थिक बाबतीत काळजी घेण्याची गरज आहे.

**वृश्चिक** – आपली मानसिक दृढता आणि कामाची ताकद तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल. संवादाने प्रश्न सोडवू शकता.

**धनु** – वैयक्तिक जीवनात किरकोळ आव्हानांचा सामना करावा लागेल. आर्थिक बाबतीत परिस्थिती चांगली असेल.

**मकर** – घरातील वातावरण आनंदी राहील. आर्थिक बाबतीत संकट येऊ शकते, पण त्यावर नियंत्रण मिळवू शकाल.

**कुंभ** – व्यक्तिगत जीवनात क्षुल्लक वाद निर्माण होऊ शकतात. करियरमध्ये नवीन संधी मिळण्याची शक्यता आहे.

**मीन** – आत्मविश्वासाने अपेक्षित गोष्टी साध्य करू शकता. आर्थिक स्थिती सुधारेल. आरोग्याची काळजी घ्यावी.

# चाकण शिक्रापूर मार्गावर कंटेनरची पोलिसांच्या मोटारीसह आठ वाहनांना धडक





**पिंपरी (अभिजीत येरल्लू) :** चाकण-शिक्रापूर मार्गावर एका कंटेनरने पोलिसांच्या वाहनासह आठ वाहनांना धडक दिली.यात एका लहान मुलीसह पोलीस कर्मचारी जखमी झाला आहे. एका पोलिस अधिकाऱ्याने वेळेतच वाहनातून उडी मारल्याने त्याचा जीव वाचला आहे.नागरिकांनी कंटेनर चालकाला पकडून चोप दिला आहे.ही घटना गुरुवारी ( १६ जानेवारी) दुपारी साडेबाराच्या सुमारास तळेगाव चौकात घडली.दरम्यान,कंटेनर चालक मद्यधुंद अवस्थेत असल्याचे प्रत्यक्षदर्शी नागरिकांचे म्हणणे आहे. पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन वैद्यकीय चाचणीसाठी नेले आहे.

ाबाबत माहिती अशी कि,चाकण येथून शिक्रापूरकडे जाणाऱ्या कंटेनर ट्रकने तळेगाव चौकात एका दुचाकीला धडक दिली. त्या दुचाकीवर दोन महिला आणि एक ११ वर्षीय मुलगी जात होत्या.कंटेनरने धडक दिल्याने दुचाकीवरील महिला आणि मुलगी रस्त्यावर पडल्या.मुलीच्या पायावर कंटेनरचे चाक गेले आणि त्यात ती गंभीर जखमी झाली.अपघात झाल्यानंतर कंटेनर शिक्रापूरच्या दिशेने निघून गेला. तसेच तो रस्त्यात आणखी वाहनांना धडक देत असल्याची माहिती चाकण पोलिसांना मिळाली.

कंटेनरने पुढे जात असताना सुरुवातीला एका कारला धडक दिली. यात कारचे मोठे नुकसान झाले.अपघात झाल्यानंतर थांबण्याऐवजी चालकाने कंटेनर तसाच पुढे नेला. त्यामुळे पोलिसांनी कंटेनरचा पाठलाग सुरू केला. पुणे ग्रामीण पोलिस दलाच्या अंतर्गत असलेल्या शिक्रापूर पोलिस ठाण्याच्या हद्दीत वाजेवाडी येथे कंटेनर चालकाला पकडण्यात यश आले. दरम्यान कंटेनरने सुमारे सात ते आठ वाहनांना धडक दिली. चाकण आणि शिक्रापूर पोलिसांनी वाजेवाडी येथे रस्त्यात डंपर आडवा लावून कंटेनर अडवला. त्यानंतर नागरिकांनी कंटेनर चालकाला चांगला चोप दिला. त्यात कंटेनर चालक जखमी झाला आहे. कंटेनरने पोलिसांच्या वाहनाला देखील धडक दिली असून त्यामध्ये एक वॉर्डन जखमी झाला आहे.

ट्रक प्रथम एका कारला धडकला आणि नंतर पाठलाग करताना इतर वाहनांना धडकला. सात वाहनांना धडक दिल्याची पुष्टी झाली आहे.आम्ही आणखी काही नुकसान झाले आहे का याचा तपास करत आहोत. चाकण पोलिसांनी चालकाला ताब्यात घेतले आहे.

# शेठ ज. नौ. पालीवाला महाविद्यालयात अवतरली भूगोलाची शाळा

**पाली (भुषण सुतार) :** मकर संक्रात आणि जागतिक भूगोल दिनाचे औचित्य साधत पाली सुधागड येथील शेठ ज. नौ . पालीवाला महाविद्यालयात अनेक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमाची रंगत महाविद्यालयाच्या वाणिज्य, विज्ञान व कला विभागातील मुलांनी वाढवली

या कार्यक्रमात मॉडेल, पोस्टर, रांगोळी, प्रश्नमंजुषा अशा अनेक प्रकारच्या स्पर्धांचे आयोजन केले होते. ज्वालामुखी, सौरमंडळ यांचे मॉडेल, भूगोलातील स्थळदर्शक, हवामान दर्शक, प्राकृतिक व राजकीयनकाशे, भौगोलिक उपकरणे, पृथ्वीगोल यांचे प्रदर्शन व चित्र प्रदर्शन भरवण्यात आले होते. अशा अनेक आगळ्यावेगळ्या स्पर्धा आयोजित करण्याची संकल्पना महाविद्यालयाचे प्राध्यापक सागर ससाने यांची होती. वाढते प्रदूषण व बदलते हवामान ऋतुमान पाहता आपण या दिनाला महत्त्व द्यायला हवे असे मत महाविद्यालयातील प्राध्यापक सागर ससाने यांनी मांडले




या कार्यक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुधाकर लाहुपचांग यांनीकेले व भूगोल विभाग प्रमुख डॉ. सर्जेराव आ.पाटील यांनी मुलांना भूगोलाचे महत्त्व व भूगोल विषय आजच्या काळाची गरज हे आपल्या मनोगताद्वारे समजावून सांगितले, प्राचार्य डॉ. सुधाकर लाहुपचांग यांनी विद्यार्थ्यांना भूगोलातील अनेक संकल्पनांचा परिचय करून दिला. भूगोलाचे विशेष महत्त्व समजावून सांगितले. त्याचबरोबर प्रमुख उपस्थिती म्हणून अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. अनिल झेंडे व ग्रंथपाल लिंतेज उके हे उपस्थित होते त्यांनीही जगाच्या भूगोलाची मुलांना तोंड ओळख करून दिली.या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्राध्यापक महेश राहीज यांनी केले.

SPORT

# 'How many captains have done that?': Yuvraj Singh on Rohit Sharma dropping himself from India's playing 11

**NEW DELHI :**India captain Rohit Sharma dropped himself from the playing eleven in the fifth and final Test of the Border-Gavaskar Trophy series against Australia after to find form in the previous games. The veteran opener struggled to reach double-figures in the matches he played in that series and in an act of 'selfless-ness' he opted out of the side in the Sydney letting fast-bowler Jasprit Bumrah lead the pack. Former India cricketer Yuvraj Singh, one of the finest batters to ever play the game lauded Rohit for resting himself from the Sydney Test.

Head coach Gautam Gambhir's tactics and ability as a manager is also under the scanner but the ODI and T20 World Cup winner backed both his former teammates.

"I have said it previously also. You guys look at series by series. If India wins a series you talk good things, if they lose you criticise," said Yuvraj to PTI.

"I always look at the team graph over a five-year period or three years. If you talk about Rohit, Gautam has just come into the system, he needs more time. Rohit Sharma has won the T20 World Cup as captain, he was captain when India played the ODI World Cup final. He led MI (Mumbai




Indians) to five IPL titles. The guy has stepped down from the last match and given somebody else a chance. How many captains have done that in the past? Please tell me," he asked.

India lost the series Down Under but standout performances came from opener Yashasvi Jaiswal and rookie Nitish Reddy, who made a memorable hundred in the Melbourne Test.

"Nitish scored a hundred on his first tour, it is amazing. Not sure how many have done that. Jaiswal scored 150 plus in his first Test in Australia, it is highly commendable. We should talk about these performances more," added Yuvraj.

While the likes of Shubman Gill, Yashasvi Jaiswal and Rishabh Pant have confirmed their availability for the Ranji Trophy, big names like Rohit Sharma and Virat Kohli are yet to confirm their participation in domestic cricket. Rohit did practice with the Mumbai team while DDCA are yet to hear from Kohli about his availability.

Yuvraj Singh has emphasized the importance of playing domestic cricket, sending a strong message to the out-of-form Rohit Sharma and Virat Kohli. Having shared the field with both players—winning the 2007 T20 World Cup alongside Rohit and the 2011 ODI World Cup with Kohli—Yuvraj believes that regardless of a player's reputation or stature, prioritizing domestic cricket whenever possible is crucial. "It is very important to play domestic cricket. Everyone should play domestic cricket if they are not injured and if they have the time," said Yuvraj told one leading newspaper.

# 435/5! India create their biggest ODI total record vs Ireland




### Most boundaries in an Innings in Women ODIs

- NZ-W: 71 vs IRE-W, Dublin 2018
- NZ-W: 59 vs IRE-W, Dublin 2018
- IND-W: 57 vs IRE-W, Rajkot 2025
- ENG-W: 56 vs SA-W, Bristol 2017
- NZ-W: 53 vs IRE-W, Dublin 2018

### This is now the highest team total for India in ODIs (Men or Women)

- India Women : 435/5 vs IRE, Rajkot 2025
- India Men : 418/5 vs WI, Indore 2011
- India Men : 414/7 vs SL, Rajkot 2009
- India Men : 413/5 vs BER, Port of Spain 2007
- India Men : 410/4 vs NED, Bengaluru 2023

**NEW DELHI :** India Women set a new benchmark in one-day international cricket on Wednesday by recording their highest-ever total in the format. Powered by centuries from Pratika Rawal and captain Smriti Mandhana, India crossed the 370-run mark in the 42nd over of the third ODI against Ireland in Rajkot, rewriting their previous record.

India posted a mammoth 435/5 in their allotted 50 overs, surpassing all previous team totals by both Indian men's and women's teams in ODIs.

This monumental feat overshadowed the Indian men's highest score of 418/5, achieved against the West Indies in Indore in 2011.

Go Beyond The Boundary with our YouTube channel. SUBSCRIBE NOW!

Other notable entries on the list include 414/7 against Sri Lanka in Rajkot (2009), 413/5 against Bermuda in the 2007 World Cup, and 410/4 against the Netherlands in Bengaluru (2023). The Rajkot innings marked a defining moment, further showcasing the rising dominance of India Women in international cricket.

Just three days earlier, India Women had posted 370 for 5, their highest ODI total at the time. However, they surpassed their own record in emphatic fashion during this match.

Captain Smriti Mandhana stole the spotlight with a blistering knock, smashing the fastest ODI century by an Indian women's batter. She reached her 100 in just 70 balls, breaking Harmanpreet Kaur's previous record of an 87-ball ton against South Africa in Bengaluru last year.

Mandhana's innings of 135 off 80 balls was studded with 12 fours and seven sixes, boasting an impressive strike rate of 170.9. Her outstanding performance came in a dead-rubber match, with India already holding an unassailable 2-0 lead in the series. Opting to bat first, Smriti put on a masterclass, dismantling Ireland's bowling attack with ease.

Smriti and Pratika Rawal forged a record-breaking 233-run opening partnership, the highest by an Indian women's opening pair in home ODIs. This remarkable stand laid the foundation for India's mammoth total.

Also See: Champions Trophy 2025 Schedule

Mandhana's innings also saw her achieve a personal milestone, becoming the first Indian woman to score 10 ODI centuries. She joins an elite group of openers with double-digit tons in the format, alongside Australia's Meg Lanning (15) and New Zealand's Suzie Bates (13).

# BCCI says no to KL Rahul and Sanju Samson for Champions Trophy; Rishabh Pant, Jurel set to be India's keepers

**NEW DELHI :**Samson was named in the probable list for the Vijay Hazare Trophy, which features 30 players. Yet, the India star was not picked for the tournament after not reporting for Kerala's training camp. The side played two practice matches at the Krishnagiri Stadium in Wayanad, after which the selectors named the 19-man squad. Salman Nazir was named the captain of Kerala after his impressive show in the Syed Mushtaq Ali tournament.

Samson was in the running for the second keeper's slot in India's Champions Trophy but the right-hander's last 50-over game came in India's tour of South Africa in December 2023. The BCCI has maintained a strong stance about national players skipping domestic without proper injury cause or injury concern. It is for this reason that it is likely that Samson will not be considered for the Champions Trophy even though he continues to be the No.1 choice in T20Is. Samson is set to open the batting with Abhishek Sharma in India's home series against England.

The debate around the second keeper's spot has gained momentum after PTI reported that KL Rahul was no longer in consideration for the specialist keeper's role in ODIs. "KL Rahul's presence behind the stumps during the ODI World Cup gave the Indian team the balance but the stylish Karnataka right-hander is unlikely to don the big gloves in white-ball cricket going forward," the report said.

In the case of keeper's slot, Rishabh Pant is the first choice by a country mile but the second keeper's slot could be a three-way fight between Dhruv



Jurel, Sanju Samson and Ishan Kishan. As of now, it looks like Jurel could win the battle.

Kishan played 27 ODIs to score 933 runs at an average of 42-plus with a double hundred and seven half-centuries to show for his efforts.


But he has fallen a bit out of favour with the current selection committee after skipping domestic cricket last year, which led to him losing his BCCI annual central contract.

Kishan has had a modest Vijay Hazare Trophy where he scored 316 runs in seven games with a single hundred against one of the NE states.

While Kishan was a part of the World Cup squad, young UP and Rajasthan Royals man Jurel has impressed one and all and could certainly walk in as the second keeper.

Jurel has been kept in the T20 squad for England also as Sanju Samson's understudy. While he has made his T20I debut in Zimbabwe, his selection in the shortest format is significant as the selection committee, led by Ajit Agarkar, seemed to be keen on keeping him in the white-ball scheme of things.

It is understood that going forward, Pant and Jurel could be one and two for India in Tests and ODIs, while Samson is believed to be only suited for the T20 version where he has scored three centuries in the fag end of 2024.



# महाकुंभमुळे विमान प्रवास १६२ टक्क्यांनी महागला

● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :

उत्तर प्रदेशातील प्रयागराजमध्ये १३ जानेवारीपासून महाकुंभमेळयाला सुरुवात झाली असून, देशासह जगभरातील भाविकांची पावले प्रयागराजकडे वळू लागली आहेत. अशात विमान तिकिटांच्या दरांमध्ये मोठी वाढ झाल्याचे पाहायला मिळत आहे. प्रयागराजला जाण्यासाठी अनेक भाविक विमान प्रवासाला पसंती देत असल्याने विमान तिकिटांच्या किमतीत मोठी वाढ झाली आहे.

१३ जानेवारी ते २६ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत प्रयागराजमध्ये महाकुंभमेळयाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामुळे प्रयागराजला जाणाऱ्या विमानांच्या मागणीत मोठी वाढ झाली आहे. ट्रॅव्हल पोर्टल ixigo च्या माहितीनुसार, दिल्लीहून प्रयागराजला जाणाऱ्या विमानाच्या तिकीट दरात २१ टक्क्यांनी वाढ झाली आहे. त्यामुळे या मार्गावरील एकेरी भाडे आता सरासरी ५,७४८ रुपये झाले आहे. त्याचप्रमाणे, मुंबई-प्रयागराज विमानांच्या तिकीट दरांमध्ये १३ टक्क्यांनी वाढ झाली आहे. त्यामुळे या मार्गावरील विमान भाडे आता सरासरी ६,३८१ रुपये झाले आहे.

दरम्यान मध्य प्रदेशातील भोपाळ ते प्रयागराज मार्गावरील विमानांच्या भाड्यात सर्वाधिक ४९८ टक्क्यांची वाढ झाली आहे. गेल्या वर्षी भोपाळहून प्रयागराजला जाण्यासाठी २,९७७ रुपये इतके विमान भाडे होते. ते आता १७,७९६ रुपये इतके झाले आहे. बेंगळुरू ते प्रयागराज आणि अहमदाबाद ते प्रयागराज यासारख्या इतर मार्गांवरही अनुक्रमे ८९ टक्के आणि ४१ टक्के भाडेवाढ झाली आहे.

प्रयागराजला जाणाऱ्या विमानांच्या तिकिटांमध्ये गेल्या काही वर्षांमध्ये १६२ टक्क्यांनी वाढ झाली आहे. विशेष म्हणजे, लखनौ आणि वाराणसीसारख्या जवळच्या शहरांतून प्रयागराजला जाणाऱ्या विमानांची तिकिटेही अनुक्रमे ४२ टक्के आणि १२७ टक्क्यांनी वाढली आहेत. यावरून महाकुंभमेळयाकडे भाविक मोठ्या संख्येने आकर्षित होत असल्याचे दिसते.

### ४४ दिवस चालणार यंदाचा महाकुंभ मेळा

यंदाचा महाकुंभ मेळा १३ जानेवारी ते २६ फेब्रुवारी २०२५ असा तब्बल ४४ दिवस चालणार आहे. यासाठी उत्तर प्रदेश सरकारने महाकुंभमेळा जिल्हा असा नवा जिल्हा निर्माण केला आहे. सुमारे ६ हेक्टर परिसरामध्ये या जिल्ह्याची निर्मिती करण्यात आली असून, त्यातील ४ हजार हेक्टरमध्ये प्रत्यक्ष महाकुंभमेळयाचे आयोजन करण्यात आले आहे, तर १९०० हेक्टर परिसरामध्ये वाहनांच्या पार्किंगची व्यवस्था करण्यात आली आहे.

# 'आर्टी' मध्ये ८५ टक्के सवलतीत विक्रीसाठी पुस्तके उपलब्ध

● मुंबई, राकेश गायकवाड :

महागडी पुस्तके जर आपणाला शंभर- दीडशे रुपयात मिळाली तर आश्चर्य वाटेल, पण हे खरे आहे. नव्याने स्थापन झालेल्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाअंतर्गत असणाऱ्या अण्णा भाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था (आर्टी) या संस्थेने महापुरुषांचे विचार सर्वदूर पोहोचवण्याचा उपक्रम हाती घेतला असून, ८५ टक्के सवलतीत ही पुस्तके आर्टीच्या कार्यालयात उपलब्ध असल्याची माहिती आर्टीचे व्यवस्थापकीय संचालक सुनील वारे यांनी दिली.

देशातील अनेक महापुरुषांनी पुस्तकांच्या माध्यमातून आपले विचार समाजापर्यंत पोचविण्याच काम केले. त्यांचे विचार नवीन पिढीपर्यंत घेऊन जाण्यासाठी बार्टीचे महासंचालक श्री. वारे आणि निबंधक इंदिरा आस्वार यांच्या संकल्पनेतून आर्टी संस्थेने महापुरुषांच्या पुस्तकांवर ८५ टक्के सवलत देण्याचा अभिनव उपक्रम सुरु केला आहे.

### पुस्तकाची मूळ किंमत व कंसात सवलतीत दर पुढील प्रमाणे

भारताचे संविधान ४५० रुपये (६३), शूद्र पूर्वी कोण होते? ३०० (४५), बुद्ध आणि त्यांचा धम्म ४०० (६०), डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र चांगदेव खैरमोडे सेट ४ हजार (६००), समग्र आंबेडकर चरित्र बो. सी. कांबळे सेट २५०० (३७५), फकिरा १६० (२४), फकिरा इंग्रजी अनुवाद २५०० (३७५), अण्णाभाऊंची दर्दभरी दास्तान ४८० (७२), राजर्षी शाहू रयतेच्या राज्याचे चित्रमय चरित्र १५०० (२२५), साहित्यसम्राट १५० (२३), स्वराज्य ते स्वातंत्र्य आणि समता १२० (१८), कर्तृत्व आणि व्यक्ति महत्त्व. ११०० (१६५). एकूण किमत ११ हजार ५२६ रुपये किमतीची पुस्तके सवलतीच्या दरात १७३० रुपयात उपलब्ध होणार आहेत.

# महापालिकेच्या एका निर्णयामुळे शहरात वाढणार गुलाबी रिक्षांची संख्या !



● पुणे, अभिजीत येरल्लू :

शहरातील गरजू महिलांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यासाठी गुलाबी (पिंक) रिक्षा खरेदी करण्यास अर्थसाहाय्य देण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. राज्य सरकारने नुकतीच 'पिंक ई रिक्षा' ही योजना राज्यात लागू केली आहे. त्याची अंमलबजावणी महापालिकेकडून केली जाणार आहे. ई-रिक्षाची किंमत तीन लाख ७३ हजार आहे. त्यापैकी लाभार्थी महिलांनी केवळ ३७ हजार ३०० रुपये भरायचे आहेत. शासनाकडून ७४ हजार ६०० रुपये दिले जाणार आहेत. या रिक्षासाठी कर्जाचा व्याजदर ९.३ अधिक २.७५ टक्के असून संबंधित महिलांनी पाच वर्षांमध्ये महिन्याला सहा हजार रुपयांचा हप्ता भरून याची परतफेड करायची आहे. पिंक ई-रिक्षाच्या दर तीन महिन्यांनी एक याप्रमाणे पाच वर्षांसाठी २० दुरुस्ती सेवा (सर्व्हिसिंग) देखील मोफत दिल्या जाणार आहेत.या रिक्षांची नोंदणी आणि विमा वितरकांकडून मोफत काढला जाणार आहे. तसेच संबंधित लाभार्थी महिलांना ही रिक्षा चालविण्यासाठीचे प्रशिक्षण आणि वाहन परवानादेखील या वितरकांमार्फत मोफत उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या रिक्षांसाठीचा भाडेदर प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत निश्चित केला जाणार आहे. महापालिकेच्या क्षेत्रीय कार्यालयांमधील समाज विकास विभागाच्या कार्यालयात या योजनेची माहिती मिळणार असल्याचे महापालिकेच्या समाज विकास विभागाचे उपायुक्त नितीन उदास यांनी सांगितले. पिंक रिक्षा योजनेमुळे गरजू महिलांना रोजगाराची संधी उपलब्ध होणार आहे. अधिकाधिक महिलांनी या योजनेचा लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी पालिकेच्या क्षेत्रीय कार्यालयांच्या समाज विकास विभागाच्या कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन पुणे महापालिकेच्या समाजकल्याण विभागाचे उपायुक्त नितीन उदास यांनी केले आहे.

# चिरनेरच्या सेंद्रिय गोड वालांना हवे भौगोलिक मानांकन



● उरण, भावना जैन :

सेंद्रिय खत आणि नैसर्गिक पद्धतीने पिकणाऱ्या चविष्ट आणि गोड वालांना भौगोलिक मानांकन मिळावे अशी मागणी चिरनेरच्या शेतकऱ्यांनी केली आहे. यासाठी चार वर्षांपूर्वी कृषी विभागाकडून हा प्रस्ताव देण्यात आला आहे. मात्र त्याची दखल घेण्यात येत नसल्यामुळे शेतकऱ्यांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे.

चिरनेरचे शेतकरी अतिशय कष्टाने आणि नेटाने सेंद्रिय खतांचा आणि नैर्गिक पद्धतीचा वापर अनेक वर्षे उत्तम प्रतीच्या वालाचे पीक घेत आहेत. भात शेतीनंतर हे पीक घेतले जाते. थंडीच्या दिवसांत पडणाऱ्या दवावर या वालाचे पीक घेतले जाते. शेणखत आणि शेतातील पालापाचोळा यांचा वापर करून हे पीक घेतले जाते. या पिकांचे जंगलातील प्राण्यांपासून संरक्षण करण्यासाठी शेतकऱ्यांना रात्री जागवाव्या लागतात. चिरनेर मधील वालाचे वाण हे पारंपरिक आहे. त्याचे जतन करण्याचे काम येथील सेंद्रिय शेती गटाने केले आहे. त्यांच्या माध्यमातून वालांना भौगोलिक मानांकन मिळविण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

### अडीचशे रुपये किलोचा दर

■ चिरनेरच्या सेंद्रीय वालाला बाजारात इतर वालांच्या तुलनेत अधिकचा दर मिळत आहे. इतर वालाना १०० ते १२५ दर मिळत असताना चिरनेरच्या वालांना मात्र किलोला २५० रुपयांचा दर मिळत आहे.

■ चिरनेरचा वाल हा चविष्ट असल्याने वालाच्या शेंगाची पोपटी प्रसिद्ध आहे. त्यामुळे चिरनेर परिसरात मोठ्या प्रमाणात मागणी आहे. भौगोलिक मानांकन मिळाल्यानंतर याचा शेतकऱ्यांना लाभ होणार आहे. त्यामुळे येथील शेतकऱ्यांची प्रतिष्ठा वाढून दरही वाढेल.




# श्रीमती पी. एन. दोशी महिला महाविद्यालयात राष्टीय युवा दिन साजरा

● मुंबई, विशाल कारंडे :

घाटकोपर स्थित एस. पी. आर. जे. कन्याशाळा संचालित पी.एन. दोशी महाविद्यालयातील स्वामी विवेकानंदांना मानवंदना देण्यात आली. श्रीमती देविलाबेन डिपार्टमेंट ऑफ मास मीडिया यांच्या जन्म दिनाचा कार्यक्रम आयोजित केला होता.स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी करण्यात आली. हा दिन युवा दिन म्हणून साजरा केला जातो. मास मीडिया च्या मुलींनी सुविचार, कविता, त्यांच्या सोबत घडलेले प्रसंग त्यांच्या बद्दलचे विचार मांडले. विद्यार्थ्यांना अनेक सामाजिक व व्यक्तीगत, व्यावसायिक समस्याना घाबरून न जाता विवेकानंद यांनी सांगितल्या प्रमाणे निर्भयपणे सामोरे जाण्याचा संदेश दिला. स्वामी विवेकानंद यांचे विचार आत्मसात करण्याची प्रेरणा दिली. स्वामी विवेकानंदांचा एखादा विचार देखील युवकांमध्ये सकारात्मकता निर्माण करू शकतो.

# नाशिक शहरातील ३३ स्मार्ट वाहनतळांचे पुनरुज्जीवन

● नाशिक, सचिन कदम :



वर्दळीचे ठिकाण, विशिष्ट काळात होणारी गर्दी आणि ना फेरीवाला क्षेत्राचा अभ्यास करून आकारास आलेल्या, परंतु करोनापश्चात ठेकेदाराच्या कार्यपद्धतीने बारगळलेल्या शहरातील ३३ स्मार्ट वाहनतळांना नव्याने पुनरुज्जीवित करण्याचे महापालिकेने निश्चित केले आहे. सशुल्क (पे अॅण्ड पार्क) तत्वावर ही वाहनतळे चालविण्यासाठी त्रयस्त्र यंत्रणेला दिली जाणार आहेत. तसेच शहरातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी परिपूर्ण आराखडा तयार करण्यात येणार आहे.

शहरात वाहतूक कोंडी आणि वाहनतळाचा प्रश्न उग्र स्वरुप धारण करत आहे. अनेक व्यावसायिक आणि निवासी संकुलात वाहनतळाची व्यवस्था नसल्याने मुख्य रस्त्यांवर, लगतच्या परिसरात वाहने जिथे जागा मिळेल, तिथे उभी केली जातात. वाहनांच्या गर्दीमुळे रस्त्यावरील वाहतुकीत अडथळे येतात. वाहतूक कोंडी होते. या समस्येतून मार्ग काढण्यासाठी काही वर्षांपूर्वी महापालिका आणि स्मार्ट सिटी कंपनीने स्मार्ट वाहनतळाची संकल्पना प्रत्यक्षात आणली होती. त्या अंतर्गत २८ ठिकाणी रस्त्यावर तर, पाच ठिकाणी रस्त्यालगतची जागा वाहनतळासाठी निश्चित करण्यात आली होती. संबंधित ठिकाणी चिन्हांकन होऊन प्रायोगिक तत्वावर ठेकेदारामार्फत ते सुरू करण्यात आले होते. करोना काळानंतर मात्र संबंधितांचे स्वारस्य संपले. सवलती आणि तत्सम मागण्या करुन त्याने यातून अंग काढून घेतले. स्मार्ट सिटी कंपनीने ३३ वाहनतळांची जागा महापालिकेच्या स्वाधीन केली. तेव्हापासून वाहनतळासाठी निश्चित झालेल्या जागा पडून आहेत. काही ठिकाणी वाहनधारक त्यांचा वापर करतात. मात्र महापालिकेला कुठलेही उत्पन्न मिळत नाही. वाहनतळाचा प्रश्नही कायम आहे. या पार्श्वभूमीवर, वाहनतळ व्यवस्थेत सुधारणा करण्यासाठी मनपा आयुक्त मनिषा खत्री यांनी विविध वाहनतळांना भेटी देऊन प्रत्यक्ष पाहणी केली. यात ३३ स्मार्ट वाहनतळातील काहींचा समावेश होता.

### मनपाकडून सुविधांची पूर्तता

शहरात रस्त्यावर २८ आणि रस्त्यालगतच्या पाच ठिकाणी अशी आधीच निश्चित झालेली एकूण ३३ वाहनतळे पुनरुज्जिवित करण्यात येणार आहेत. बाह्य यंत्रणेमार्फत (आऊट सोर्स) ही वाहनतळे चालविली जातील. या ठिकाणी स्वच्छता व मूलभूत सुविधाची पूर्तता महापालिका करणार आहे.

– मनिषा खत्री (आयुक्त, नाशिक महानगरपालिका)

# ८:२४,ची लोकल वातानुकूलितच, आंदोलनानंतरही रेल्वे प्रशासन ठाम

● भाईंदर, विशाल पाटील :



भाईंदर रेल्वे स्थानकावरून सकाळी ८ वाजून २४ मिनिटांनी सुटणारी वातानुकुलीत लोकल कायम सुरू ठेवणार असल्याचे पश्चिम रेल्वेने स्पष्ट केले आहे. ही लोकल एसी ऐवजी सर्वधारण करावी यासाठी रेल्वे प्रवाशांनी आंदोलन केले होते. मात्र प्रवाशांना दिलासा देण्यासाठी भाईंदर स्थाकातून सकाळी ८ वाजता सुटणारी सर्वसाधारण लोकल ट्रेन १२ ऐवजी १५ डब्यांची केली जाणार आहे.

भाईंदर रेल्वे स्थानकातून दररोज सकाळी ८ वाजून २४ मिनिटांनी चर्चगेटला जाणारी लोकल ट्रेन सुटत होती. मात्र नोव्हेंबर महिन्यात ही लोकल ट्रेन वातानुकूलीत (एसी) करण्यात आली. त्यामुळे प्रवाशांनी जोरदार विरोध केला होता. ही लोकल पुन्हा सुरू करावी यासाठी सह्यांची मोहीम घेण्यात आली. विविध राजकीय पक्षांनी यासाठी आंदोलने देखील केली होती.

### म्हणून वातानुकूलीत लोकल सुरू केली..

■ याबाबत रेल्वने लेखी स्पष्टीकरण दिले आहे. दररोज सकाळी ७.५९ वाजता विरार वरून चर्चगेटला जाण्यासाठी एसी लोकल सुटते. मात्र त्यात गर्दी होत असल्याने भाईंदर, मिरा रोड, दहिसर स्थानकातील प्रवाशांना त्यात चढणे अवघड होत होते. त्यामुळे भाईंदर वरून एसी लोकलची आवश्यकता होती. भाईंदर स्थानकातून सकाळी ८ ते ८. ३० दरम्यान चर्चगेटच्या दिशेने जाण्यासाठी साधारण ९ गाड्या आहेत. त्यामुळे फक्त ८. २४ ची एक सर्वसाधारण लोकल वातानुकुलित करण्यात आली आहे. तरी देखील प्रवाशांची गैरसोय होऊ नये यासाठी ८ वाजता सुटणाऱ्या भाईंदर- चर्चगेट लोकलमध्ये ३ डबे वाढवून १२ ऐवजी १५ डब्यांची करण्यात आली आहे, असे पश्चिम रेल्वेचे अतिरिक्त व्यवस्थापक प्रकाश बुटणी यांनी सांगितले.

# सैफ अली खानवरील हल्ला - कायदा सुव्यवस्थेची लक्तरे वेशीवर टांगणारा : नाना पटोले

## राज्यात वाढती गुन्हेगारी हे सरकारचे अपयश

● मुंबई, विशाल पाटील :



पद्मश्री पुरस्कार सन्मानीत सुप्रसिद्ध अभिनेता सैफ अली खान यांच्यावर झालेला खुनी हल्ला राज्याच्या कायदा सुव्यवस्थेची लक्तरे वेशीवर टांगणारा आहे. वांद्रे या हायप्रोफाईल भागात अशा घटना होत असतील तर मुंबईत कोण सुरक्षित आहे? मुंबई, पुणे, बीड, परभणी, नागपूर येथील वाढत्या गुन्हेगारी घटना पाहता राज्यात गृहमंत्री आहेत का? असा सवाल करत राज्यात गुंडाराज फोफावले असून सैफ अली खानवरील हल्ला महाराष्ट्राच्या कायदा सुव्यवस्था दिलेले आव्हान आहे. हे सरकारचे अपयश आहे, असा घणाघाती हल्लाबोल कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे.

राज्यातील कायदा सुव्यवस्थेच्या प्रश्नावर भाजपा महायुती सरकारचा समाचार घेताना पटोले म्हणाले की, भाजप सरकारमध्ये गुन्हेगारांचे मनोबल वाढले असून मुख्यमंत्री व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह त्यांच्या लाडक्या पोलिस महासंचालक अत्यंत निष्क्रीय आहेत. मुंबईला दोन पोलिस आयुक्त आहेत तरीही राज्यात आणि मुंबईत कायदा सुव्यवस्था नाही. बीडमधील संघटीत गुन्हेगारी व त्याला असलेले राजकीय आशिर्वाद, परभणीत पोलिस कोठडीत मृत्यू, वांद्र्यात माजी मंत्री बाबा सिद्दीकी यांची गोळ्या झाडून हत्या, अभिनेता सलमान खानच्या घरावर गोळीबार या गंभीर घटना आहेत.

# विकासात राज्याचा पहिला जिल्हा होऊ पाहणाऱ्या गडचिरोलीत वाळू तस्करांच्या हप्त्यांमुळे......

● नागपूर, नितीन देवळेकर :



विधानसभा निवडणुकानंतरही जिल्ह्यात वाळूचा गोंधळ संपला नसल्याने सर्वत्र वाळू तस्करीला उत आला आहे. यामुळे मध्यरात्री अवैधपणे वाळू घेऊन भरधाव जाणाऱ्या वाहनांमुळे अपघाताचे प्रमाण देखील वाढले आहे. या वाळू माफियांना महसूलमधील काही अधिकाऱ्यांचा आशीर्वाद असल्याची चर्चा असून यामुळे शासनाचा कोट्यवधींचा महसूल बुडत आहे. नद्यांचा जिल्हा अशी ओळख असतानाही लिलाव प्रक्रियेला होत असलेल्या विलंबामुळे सर्वसामान्यांना रेती मिळणे कठीण झाले आहे. दुसरीकडे वाळू माफियानी महसूलमधील काही अधिकाऱ्यांना हाताशी घेत सर्रास तस्करी सुरु केल्याचे चित्र आहे. काही दिवसांपूर्वी गडचिरोली शहाराजवळील गुरवळा घाटावर वाळू तस्करी करणाऱ्या वाहनाचा धडकेत एका व्यक्तीचा मृत्यू झाला होता. तर दोन दिवसांपूर्वी गोगाव फाट्यावर मध्यरात्री एका वाळू तस्कराचा वाहनाने दुचाकीला उडविल्याने दोन तरुणांचा मृत्यू झाला. गेल्या वर्षभरापासून जिल्ह्यातील कन्हेरी, गुरवळा, कठानी, आंबेशिवनी, चामोर्शी माल, चामोर्शी, आरमोरी, कुरखेडा, अहेरी वांगेपल्ली, भामरागड आदी भागातील नदी घाटावरून सर्रास वाळू तस्करी सुरु आहे. जेसीबी, पोकलँडच्या माध्यमातून घाटातून उपसा करण्यात येत आहे. महसूलचे अधिकारी मात्र यावर कारवाई करण्याचे सोडून घरकुलासाठी वाळू नेणाऱ्या नागरिकांना त्रास देत असल्याचे चित्र. वाळू तस्करीतून मिळणाऱ्या नफ्यामुळे अनेक तरुण वाळू तस्करीकडे वळले असून काहींनी यासाठी टिप्पर आणि ट्रॅक्टर देखील खरेदी केले आहे. यतीलच एका तरुणाने नाव न छापण्याच्या अटीवर सांगितले की, वाळू तस्करी करण्यासाठी एका ट्रॅक्टरमागे ४० तर टिप्परमागे ६० हजार रुपये महसूलच्या अधिकाऱ्यांना द्यावे लागतात.

### खनिकर्म विभागात 'वाळू माफियां'चा वावर

■ विविध कारणांनी कायम वादग्रस्त ठरलेला खनिकर्म विभाग वाळू तस्करीमुळे पुन्हा एकदा चर्चेत आहे. या विभागाकडे केव्हाही फेरफटका मारल्यास तस्करांची टोळी बसलेली असते. खनिकर्म अधिकाऱ्यांना विचारणा केल्यास ते उत्तर देत नाहीत. उलट रात्रीच्या सुमारास रेती घाट परिसरात 'पिंटू' नावाची व्यक्ती खनिकर्म अधिकाऱ्याच्या नावावर वसुलीसाठी फिरते, अशी माहिती आहे. याही संदर्भात विचारणा केळी असता खनिकर्म अधिकाऱ्याकडून समाधानकारक उत्तर मिळाले नाही. त्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालयावर नेमके कुणाचे राज्य सुरु आहे. अशी चर्चा प्रशासकीय वर्तुळात आहे.